# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.04.2025** **वार-बुधवार**

---

**शेतकऱ्यांना ओळख क्रमांक**

राज्यातल्या शेतकऱ्यांना जमीन मालकीचा पुरावा आणि ओळख क्रमांक देण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत असून, या योजनेत आतापर्यंत ९१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना याचा लाभ झाला आहे. पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा लाभ देताना ओळख क्रमांक बंधनकारक केले असून, राज्यातील ७५ टक्के लाभार्थ्यांना ओळख क्रमांक देण्यात आला आहे, अशी माहिती पुणे भूमी अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी दिली. पुणे जिल्ह्यात आतापर्यंत ४ लाख ९९ हजार २०४ शेतकऱ्यांना ओळख क्रमांक दिले आहेत.

**ससूनअहवाल**

पुण्यातील दिनानाथ रुग्णालयात झालेल्या गर्भवती मृत्यू प्रकरणात ससूनच्या सहा वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीकडून, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता एकनाथ पवार यांना हा अहवाल सादर करण्यात आला असून , पवार आज सरकारला हा अहवाल पाठवणार आहेत. तनिषा भिसे मृत्यू प्रकरणातील सर्व बाबी या तज्ज्ञांकडून तपासल्या गेल्या आहेत. मृत्यूची जबाबदारी नेमकी कोणाची यावर चर्चा करत समितीच्या निष्कर्षाचा अहवाल अलंकार पोलिसांकडे सुपूर्त करण्यात आला आहे. आता या प्रकरणी पुढील कारवाईची नेमकी दिशा ठरणार आहे.

**लष्कर**

भारत उझबेकिस्तान लष्करातील संयुक्त सराव हा दोन्ही देशांत विश्वास आणि सहकार्य निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा आहे, असं प्रतिपादन ब्रिगेडियर एस तलूजा यांनी केलं. दोन्ही देशांचा दस्तलिक हा संयुक्त सराव आजपासून पुण्यात सुरू झाला, त्यावेळी ते बोलत होते.२८ एप्रिल पर्यंत चालणाऱ्या या सरावात दोन्ही देशांचे प्रत्येकी ६० जवान सहभागी झाले असून, लष्कर आणि हवाई दलाचा यात सहभाग आहे. उझबेकिस्तानच्या
लष्करी तुकडीचे प्रमुख कर्नल जबारोव थोईर इर्गासोविच यावेळी उपस्थित होते.

**सुरक्षारक्षक**

पुणे महापालिकेतर्फे विविध ठिकाणी १ हजार ५६५ सुरक्षारक्षक नेमण्यात येणार असून त्यासाठी १ शे ३९ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली. शहरातल्या महापालिकेच्या इमारती, रुग्णालयं , उद्यानं, कार्यालयं, नाट्यगृह, शाळा, स्मशानभूमी यासह वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये सुरक्षारक्षक नेमले जातात.

**बिडीपि**

पुणे महापालिकेच्या हद्दीत असलेल्या डोंगरमाथा-डोंगरउतार तसंच जैववैविध्य उद्यान अर्थात बीडीपी आरक्षणामध्ये बांधकाम करण्यासाठी परवानगी देता येईल का, यासाठी नियमावली तयार करण्याकरता राज्य सरकारनं अभ्यासगट स्थापन केला आहे. या निर्णयाला पर्यावरणवाद्यांनी विरोध केला असून, या समितीमध्ये तज्ज्ञांना स्थान का नाही, असा प्रश्न उपस्थित केला आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेनं, तसंच राज्य सरकारनं यापूर्वीच बीडीपीमध्ये बांधकाम करता येणार नसल्याचं जाहीर केलं आहे.

**पुरस्कारपाध्ये**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे प्रकाशकांसाठी असलेल्या उत्कृष्ट ग्रंथनिमिर्ती पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. या वर्षी ९६ प्रकाशकांची ६३० पुस्तके प्रकाशक संघाला प्राप्त झाली होती. त्यातून पुरस्कारासाठी पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये विविध विभागात पुण्यातल्या रोहन प्रकाशन, राजहंस, दिलीपराज ,मिहाना पब्लिकेशन्स, न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस, सकाळ मीडिया प्रा. लि. बुकगंगा पब्लिकेशन्स, सुरेश एजन्सी संवेदना प्रकाशन आदी प्रकाशन संस्थांचा समावेश आहे.

**प्रशिक्षण**

शालेय नेतृत्व अधिक सक्षम करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अकरा मास्टर ट्रेनर्स यांनी चार दिवसीय राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यशाळेत सहभाग घेतला. ही कार्यशाळा मध्य प्रदेशमधल्या होशंगाबाद मध्ये पार पडली.या प्रशिक्षणात देशातून एकंदर ४० प्रतिनिधी सहभागी झाले होते. दिल्लीतल्या निवृत्त मुख्याध्यापकांनी उपस्थितांना सुलभ शिक्षण कौशल्य, परस्परसंवाद आणि सातत्यपूर्ण सहकार्य या विषयांवर प्रशिक्षण दिले.

**कुस्तीस्पर्धा**

लोणी काळभोरमध्ये झालेल्या खुल्या गटाच्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या अंतिम फेरीत पुण्याचा पैलवान शिवराज राक्षे हरियाणाच्या शांतीकुमार याला चितपट करत विजेता ठरला. विविध वयोगटाच्या आणि वजनी गटाच्या 61 लढती या आखाड्यात चितपट झाल्या. या स्पर्धेत महाराष्ट्र केसरी, उपमहाराष्ट्र केसरी , अर्जुन पुरस्कार विजेते मल्ल सहभागी झाले होते.

**स्पर्धा**

पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना  यांच्या मान्यतेनं सुरू असलेल्या द क्यु कल्चर करंडक अजिंक्यपद स्पर्धेत शिवम अरोरानं अजिंक्यपद पटकावलं . अंतिम फेरीत त्याने तन्मय जातकरचा १०-७ असा संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपद मिळवलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 41 अंश तर किमान तापमान 19 पूर्णांक 3  दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसून पुढील 2 ते 3  दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली  आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**